# स्वतंत्र मजूर पक्षाचे शेतकरी चळवळीतील योगदान (इ.स. १९३६ ते १९४२)

**प्रा. डॉ .कालिदास सूर्यवंशी**
इतिहास विभाग प्रमुख,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.

दिनांक 15 ऑगस्ट 1936 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाची मुंबईत स्थापना केल्यानंतर टाइम्स ऑफ इंडियाच्या प्रतिनिधीला मुलाखत देताना स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येय आणि धोरण म्हणजेच कार्यक्रम स्पष्ट केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की "आजचे युग जातीवादी पक्षाच्या संघटनेसाठी नाही हे जाणून माझ्या काही मित्राच्या इच्छेंनरुप पक्षाचे नाव व पक्षाच्या कार्यक्रमाला व्यापक स्वरूप दिले आहे. मुख्य हेतू असा की अस्पृश्य वर्ग व इतर वर्ग यांच्यात राजकीय सहकार्यास वाव राहावा. इतर राजकीय संघटनेपासून आमचा पक्ष सर्वत्र स्वतंत्र राहील. परंतु जिथे सहकार्य करणे शक्य आहे अशा इतर राजकीय पक्षाबरोबर आमचा पक्ष सहकार्य करेल. [1]

आमच्या पक्षाचा कार्यक्रम या देशातील गोरगरीब, दलित, कष्टकरी, शेतकरी यांना सर्वश्रे न्याय मिळवून देण्याचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकऱ्यांच्या हक्कासाठी लढे दिले. शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली तरच देश खऱ्या अर्थाने सुखी होईल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. [2] 17 जुलै 1937 ते 31 ऑक्टोंबर 1939 या काळात मुंबई प्रांताच्या कायदे मंडळात आणि 1942 पर्यंत कायदे मंडळाच्या बाहेर स्वतंत्र मजूर पक्षाने शेतकऱ्याच्या आणि कष्टकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढले दिले. काय ते मंडळात मजूर पक्षाच्या आमदारांनी शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी मांडलेल्या बिलाच्या चर्चेवेळी विधायक सूचना करून शेतकऱ्याचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न केला.

ज्यावेळी शेतकऱ्यांचे कर्ज निवारण, कुळ कायदा, जमीन महसूल, तंबाखूवरील कर, कर्ज तहकुबी आणि करवाढ अशी बीले मुंबई कायदे मंडळात चर्चेला आली त्यावेळी मजूर पक्षाच्या आमदारांनी शेतकरी आणि शेतमजुराच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती बदल घडविण्यासाठी क्रांतिकारी विचार मांडले.

वरील विषयाच्या संदर्भातील धोरण ठरवितांना मजूर पक्षाच्या आमदाराच्या मागण्या जरी फेटाळल्या असल्या तरीही त्या सुचनाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. शेतकऱ्याच्या प्रश्नाकडे राज्यकर्त्या पक्षाचे लक्ष वेधण्यासाठी विरोधी पक्षाच्या वतीने जेव्हा जेव्हा शेतकरी वर्गाच्या बाजूने मोर्चाचे आयोजन केले होते त्यात मजूर पक्षाच्या आमदारांनी, कार्यकर्त्यांनी महत्त्वाचा सहभाग नोंदविला होता.

12 ऑक्टोंबर 1939 रोजी सरकारी पक्षाने शेतकऱ्याचे कर्ज निवारण विधेयकाचा मसुदा मुंबई कायदे मंडळात मांडला. त्या विधेयकावर झालेल्या विस्तृत चर्चेत मजूर पक्षाच्या आमदारांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्या विधायकाचा फायदा ज्या एकत्र कुटुंबी कर्जदार शेतकऱ्यांचे उत्पन्न 500 रुपये पेक्षा जास्त नाही अगर स्वतंत्र कुटुंबी शेतकऱ्याचे उत्पन्न 300 रुपये पेक्षा जास्त नव्हते अशा शेतकऱ्यांना याचा फायदा मिळणार होता. [3]

कर्जापायी अनेक शेतकऱ्यांनी आपली शेती सावकाराकडे लिलावाने देऊन टाकून पुन्हा त्याच सावकाराचे कुळ म्हणून राहण्याची पाळी आली की ते लोक मग मोलमजुरी करत असत. त्यांना या कायद्याचा फायदा मिळाला पाहिजे. मजुरांना, शेतकऱ्यांना जर या कायद्याचा फायदा मिळाला नाही तर त्यांना अप्रामाणिक बनणे भाग पडले. कोकणात पाच पंचवीस मुले सावकार किंवा जमीनदार लोक गोळा करत. त्यांची लग्न करून देत त्यानंतर ते कर्ज फेडण्याची जबाबदारी त्या मुलावर पडत असे यामध्ये बरेच गरीब लोक कर्जाच्या फेऱ्यात अडकत असत. [4]

1939 रोजी कर्जदार शेतकऱ्याचे कल्याण करण्यासाठी मांडलेल्या बिलावर चर्चा करताना त्या चर्चेत स्वतंत्र मजूर पक्षाच्या आमदारांनी शेतकऱ्याच्या दृष्टीने तो कायदा हिताचा व्हावा म्हणून अनेक उपसूचना मांडल्या. कर्जदार शेतकऱ्याने कर्जाचा तपशील पाहण्याकरिता बोर्डाकडे अर्ज केला तर सावकाराने एक महिन्याच्या आत त्यांचे कागदपत्र कर्ज निवारण बोर्डापुढे हजर करावेत अशी कायद्याची तरतूद होती. याउलट कर्जदार शेतकऱ्याला आपल्या हिशोबाचा तपशील तीन महिन्यात दाखल करण्याची सवलत असावी अशी मागणी केली होती. [5]

फेब्रुवारी 1939 रोजी जेव्हा मुंबई विधानसभेत कुळांना संरक्षण देण्याची तजविज करणारे बिल चर्चेसाठी मांडले गेले. तेव्हा स्वतंत्र मजूर पक्षाच्या आमदारांनी कुळांना संरक्षण देण्यासाठी काढलेल्या अटी अनिष्ट आहेत आणि सरकारच्या धोरणामुळे कुळवर्ग निराश होईल असे विचार मांडले स्वतंत्र मजूर पक्षाच्या आमदारांनी जो विरोध या बिलाला केला तो खालील मुद्द्यावर १) बिलाची व्याप्ती अत्यंत मर्यादित होती २) खंड ठरविण्याची योजना अत्यंत सदोष होती ३) कुळाना संरक्षण देण्यासाठी त्यांच्यावर लाजलेल्या अटी

अनिष्ट होत्या श्री राजाराम होणे यांनी त्या बिलाने शेतकऱ्याला भाकर मिळण्याऐवजी दगड मिळण्याची वेळ आली असे सांगितले. [6]

मुंबई विधानसभेचे सातवे अधिवेशन मुंबई येथे सप्टेंबर 1939 रोजी सुरू झाले त्यावेळी परत कुळांना संरक्षण देणारी तजवीज करणाऱ्या बिलावरील चर्चा झाली. त्यावेळी श्री भाऊराव गायकवाड यांनी कुळ संरक्षण कायद्यातून मुंबई शहर वगळू नये असे सांगितले. तिसऱ्या दिवशी त्या कायद्यावर परत चर्चा सुरू झाली असताना श्री अनंतराव चित्रे यांच्या सुचनेला पाठिंबा देताना श्री भाऊराव गायकवाड यांनी सांगितले की जमिनीचा अथवा कुळाचा कोणताही दोषामुळे अगर निष्काळजीपणामुळे बांधवल्या नादुरुस्त झाल्या तर त्यांची दुरुस्ती करण्यासाठी लागणारे खर्च पाणी त्याचा बोजा गरीब शेतकऱ्यांना पडू नये. [7]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोकणातील जमीनदारी नष्ट करण्यासाठी चळवळ उभी केली. त्यासाठी त्यांनी कोकणात दौरे काढून कास्तकारांना खोताच्या जाचातून मुक्त करण्यासाठी लढे दिले. ज्या शेतकऱ्यावर खोताकरून हल्ले होत त्या शेतकऱ्याच्या केसेस लढविल्या आणि कोकणातील शेतकऱ्यात जागृती निर्माण केली. जमीनदारी नष्ट केल्याशिवाय कोकणातील शेतकरी आणि कष्टकरी सुखी होणार नाही असा त्यांचा ठाम समज होता. त्याचप्रमाणे मुंबई कायदेमंडळात गेल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी 1937 साली पुण्यात अधिवेशनात खोती पद्धती नष्ट करणारे बिल मांडले होते. [8]

24 जानेवारी 1938 रोजी लहान जमीन धारणा करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जफेड तहकुबी मिळवण्या साठीचे सरकारी बिल जेव्हा मुंबई विधानसभेत चर्चेला आले तेव्हा श्री शामराव परुळेकर यांनी त्या बिलाला काही दुरुस्त्या सुचविल्या. श्री राजाराम भोळे यांनी बिलाबद्दल सांगितले की शेतकरी बांधवाची सर्व साधारण स्थिती सुधारेल अशी कोणतीच योजना या दिला मध्ये नाही, श्री भाऊराव गायकवाड यांनी शेतकरी बांधवांचे हीत साधण्यासाठी त्या बिलाचा उपयोग होणार नाही या शब्दात या बिलावर टीका केली. परुळेकरांनी या बिलाला अनेक दुरुस्त्या सुचविल्या परंतु त्या सर्व सूचना बहुमताच्या जोरावर फेटाळल्या गेल्या. [9]

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र मजूर पक्षाने शेतकऱ्याच्या, कष्टकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी लढे दिले. डॉ. आंबेडकरांनी उदेरी, कणकवले आणि पडवे माजलगावच्या खटल्यात कुळाच्या बाजूने कोर्टात खटले चालविले. डॉ. आंबेडकरांनी शेतकऱ्याच्या उद्धाराचे केलेले कार्य देशातील शेतकरी चळवळीतील महत्त्वाचा टप्पा होय.

**संदर्भसूची**


१. डॉ. शेषराव नरवडे - डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष (१९३६-१९४२), निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, 2011, पृष्ठ क्रमांक 55-56.

२. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक 62-64.

३. कीर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉपुलर प्रकाशन मुंबई 1977 पृष्ठ क्रमांक 210-211.

४. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक 302-306.

५. खैरमोडे चा.भ. - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड 7, सुगावा प्रकाशन पुणे १९९८, पृष्ठ क्रमांक 78.

६. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक 82, 83.

७. गणवीर रत्नाकर, विलायते वरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रे रत्नमित्र प्रकाशन नागपूर, 1984 पृष्ठ क्रमांक 199.

८. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक 204-205

९. क्षीरसागर रामचंद्र - भारतीय रिपब्लिकन पक्ष नाथ प्रकाशन औरंगाबाद 1977 पृष्ठ क्रमांक 160-161.